World Wide Journal of Multidisciplinary Research and Development

WWJMRD 2016; 2(12): 62-63
www.wwjmrd.com
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''फ्लोरेन्स नाईटीगेल: - एक कर्तुत्ववान परिचारिका''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
"The bond that binds us together is what binds us to God. Neglecting or mistreating the poor, calling old women fools, treating the week, weak, ugly children, poor workers, handicapped is a crime against God. And Mentally ill." God is cursed. "
Florence Nightingale rested at night, serving the poor and needy, answering their questions at night. Without doing this my soul will not find peace. And because Christ would not be seen in me, Florence Nightingale was working tirelessly. She did her work with her love as a teacher, pastor, nun, maid, mother and father, and with the understanding that I am an ordinary servant of Christ. . Not only was he tempted by office but he was never ashamed to lead a normal life because Florence Nightingale knew it was the work of Christ, I am void.

**Keywords:** Christ, Florence Nightingale, God, Florence, Nurse, Nightingale Jesus, Night, Christian, Tomorrow

**प्रस्तावना:**
''ज्या एका बंधनाने आपण एकमेकांशी जोडलो गेलो तेच बंध आपल्याला देवाशी जोडते गरीबाकडे दुर्लक्ष करणे किवा त्यांच्या गैरवापर करणे,वृद्ध स्त्रियांना मूर्ख म्हणणे दुर्बल,अशक्त,कुरूप लेकरू,गरीब कार्यकर्ता,अपंग,व मानसिक दृष्ट्या आजारी असलेल्या रुग्णांना वाईटप्रकारे वागविणे हा देवाविरुद्ध गुन्हा आणि ईश्वराची निंदा आहे''.
फ्लोरेन्स नाईटिगेल यांच्या जन्म इंग्लंडला इ.स १८२० मध्ये एका श्रीमंत कुटुंबात झाला.एका आरामदायी जीवणातून या महिलेने दिन-दुबळ्या लोकांची संपूर्ण जीवनभर सेवा आणि शुसुश्रा केली. *जेकब आबेट यांनी लिहिलेल्या कोनशीला या पुस्तकातून त्याचे हृदय परिवर्तन झाले* .फ्लोरेन्स नाईटिगेल यांनी परिवर्तनानंतर एका समर्पित ख्रिस्ती व्यक्तीला प्रश्न केला " *असहाय्य व दुःखी जनांच्या वेदना हलक्या कशा करता येईल"* उत्तर आले *परिचारिका* बनून,मग *22* वर्षीय फ्लोरेन्स नाईटिगेल यांनी परिचारिकेचे शिक्षण घेऊन देवाच्या कार्याची सुरुवात केली.आणि आपल्या हयातीतच फ्लोरेन्स नाईटिगेल ने एक हजार नर्सिंग प्रशिक्षण शाळा काढल्या,१३ ऑगस्ट १९१० मध्ये शेवटचा श्वास घेतांना आपल्या सेवा करणाऱ्या महिला आणि ख्रिस्त समाजाला एकच संदेश दिला *"युद्धाला जाणारा देवाचा पुत्र(येशू) याच्या पावलावर पाऊल टाकून पुढे यावे".हेल्पिंग हँड्स मिशन इंडियाने* हि आज (फ्लोरेन्स नाईटिगेल) यांच्या अखेरच्या शब्दावर आपले पाऊल टाकून *फ्लोरेन्स नाईटिंगेल मेडिकल रिसर्च सेंटरची स्थापना केलेली आहे,* भारतातील गरीब-गरजू आणि दिन-दुबळ्या लोकांसाठी आज ही संस्था नियमित कार्यरत राहणार आहे.
फ्लोरेन्स नाईटीगलचा जन्म इटलीतील फ्लोरेन्स या शहरात झाला त्यामुळे तिचे नाव फ्लोरेन्स असे ठेवण्यात आले. इंग्लंडमध्ये आरोग्य क्षेत्रात एक नवीन पायंडा ठेवणाऱ्या फ्लोरेन्स नाईटीगल या इंग्लंडचा ऑर्डर ऑफ मेरिट हा पुरस्कार मिळविणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या.त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून ब्रिटिश सरकारने हा पुरस्कार त्यांना दिला.
*लेडी ऑफ द लॅम्प* म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फ्लोरेन्स नाईटीगल यांच्या कार्यकर्तुत्वामुळे इंग्लड, फ्रांस, जर्मनी, अमेरिका या देशात स्त्रीयांनी आणि स्त्रीवादी लेखिकांनी प्रेरणा घेतली त्यामुळे आपण असे म्हणू शकतो की विसाव्या शतकातील स्त्रीवादी चळवळीत फ्लोरेन्स नाईटीगल यांचाची हातभार होता. स्त्रीयांच्या गाराणाची वाचा आपल्या कार्याने फोडणाऱ्या या महिलेला स्त्रीयांची ज्योत म्हणून ओळखले गेले.
रशिया इंग्लंडमधील *क्रिमीयन* युद्ध संपले होते तरी फ्लोरेन्स नाईटीगल यांनी आपले कार्य सुरूच

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

ठेवले होते.तिची मदतनीस लिहिते "आम्ही रात्री एक वाजता झोपतो,पण ती रात्रीच्या तीन,चार वाजेपर्यंत लिहीत बसते फार थोडा वेळ भोजन(भेटीला पाहुणे आले तर फार उशीर होतो) मी तिला म्हणाले,जा झोपायला ती मला म्हणते,हे कसे शक्य आहे,मेजावर असलेली अनेक पत्रांची उत्तरे मला दिलीच पाहिजे मी तीला म्हटले, मव हे काम उद्या कर ती पटकन म्हणते उद्याच्या दिवस त्याचे अधिक काम घेऊन येईल.मग रात्रभर ती तिच्या कामात गर्क असते.पण एवढा दबाव असतांनाही गोंधळगडबड मुळीच नाही.जेवण विसावा तापमान या गोष्टी कामात ढवळाढवळ करीत नाहीत."

तसेच युद्धाचा कमांडर हेन्सी स्टोकर्स यांनी फ्लोरेन्स नाईटीगल म्हटले "तू जी सेवा संपूर्ण समर्पणाने व धैर्याने केली त्यात तुझ्या सहकारी म्हणून तू काम केले त्याबद्दल मला सदैव मोठा अभिमान व कृतज्ञता वाटते.समाजातील सर्व थरातून लोकांनी तुझ्या सेवेला पसंती दिली.ज्यांना तू मदत केली अथवा गरीब व गरजवंताकडून तुझी वाहवा होत आहे यापेक्षा मला दुसरे काही प्रिय नाही.त्यांच्या स्मरणात तू सदैव राहशील" फ्लोरेन्स नाईटीगल बद्धलची साक्षी त्यांच्या कार्याची गौरव करते त्यांना कार्यतातुन त्या समाजात ओळखल्या गेल्या आणि संपूर्ण इंग्लंडच नाही तर संपूर्ण जग देखील त्याच्या आरोग्यासाठी केलेल्या कार्याबद्धल ऋणी राहील.

दिवसा गरीब आणि गरजू लोकांची सेवा करून रात्री त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देऊनच फ्लोरेन्स नाईटीगल विश्राम करीत.माझ्या देश युद्धमय स्थितीत असतांना, सैनिक झखमी असतांना,गरीब, लाचार,गरजवंत आणि दिन-दुबळ्या लोकांची वाईट अवस्था असतांना,मला झोप कशी येईल,त्यांची सेवा-शुश्रूषा केल्याशिवाय माझ्या आत्म्याला शांती लाभणार नाही.आणि ख्रिस्त माझ्यात दिसणार नाही म्हणून फ्लोरेन्स नाईटीगल या अविरतपणे आपले कार्य करीत होत्या.त्यांनी एक शिक्षिका,पाळक,नन,सेविका,आई-वडीला सारखे प्रेम आणि तसेच मी ख्रिस्ताची एक सामान्य दासी आहे असे समजून  आपले कार्य केले. त्यांना पदाचा लालच नव्हताच पण त्याचबरोबर एक सामान्य जीवन जगत असतांना त्यांना कधी लाज आली नाही.करण फ्लोरेन्स नाईटीगल हिला माहीत होते हे ख्रिस्ताचे कार्य आहे मी शून्य आहे.

**संदर्भसुची:-**

1. ख्रिस्ती मिशनरींचे योगदान,पारखे कामिल,सुगावा प्रकाशन,२००३,पुणे.
2. जगातील महान व्यक्ती,श.रा.देवळे,साकेत प्रकाशन,पुणे.